**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

# प्रेसनोट

दिनांक:- ११/०८/२०१८

## मांडुळाची तस्करी करणा-या आरोपीस मालेगावात अटक - स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

---

नाशिक ग्रामीण जिल्हयातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होणेसाठी मा.पोलीस अधीक्षक सा्o यांचे आदेशान्वये कारवाई सुरू आहे. दिनांक १० जुलै २०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मालेगाव शहरातील मोतीबागनाका परिसरात मांडुळ जातीचे सापाची तस्करी करणारे इसमास ताब्यात घेवुन कारवाई केली आहे.

दिनांक १० जुलै २०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी मालेगाव शहरात अवैध धंद्यांवर कारवाई करणेसाठी गस्त घालत होते. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त बातमीनुसार, मालेगाव शहरातील मोतीबाग नाका परिसरात काही इसम मांडुळ जातीचे सापाची तस्करी करण्यासाठी येणार असल्याचे खात्रीशीर समजले. त्यानुसार पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी मोतीबागनाका, कृष्णा लॉन्स परिसरात सापळा रचुन संशयीत इसम नामे **अभिजीत विठ्ठल जाधव, वय २८, रा. कासार मंगल कार्यालयाजवळ, मोतीबाग नाका मालेगाव** यास ताब्यात घेतले. सदर इसमाची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात असलेल्या गोणीत एक मांडुळ जातीचा काळे रंगाचा दुतोंडी साप मिळुन आला. सदर इसमास विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्याने सदर मांडुळ जातीचा साप विक्री करण्याचे उद्देशाने कब्जात बाळगतांना मिळुन आला असुन त्यास पुढील कारवाईसाठी वनविभाग मालेगाव यांचे ताब्यात देण्यात आले आहे. मांडुळ जातीचे सापाबाबत नागरीकांमध्ये बरेच गैरसमज व अंधश्रध्दा आहे, त्यासाठी काही लोकांची मोठया प्रमाणात किंमत मोजण्याची तयारी असते. बाजारात एका मांडुळास दहा हजार ते पाच लाख रूपये मोजले जातात, त्यामुळे त्याची तस्करी केली जाते. मांडुळ हे वन्यप्राणी जीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत शेडयुल तीन मधील प्राणी आहे. तो नामशेष होत असल्याने जतन करण्याची कायद्यात तरतुद आहे. नागरीकांना आवाहन करण्यात येते की मांडुळ जातीचे सर्पाबाबत कोणतीही अंधश्रध्दा ठेवु नये, मांडूळाचे तस्करीबाबत निदर्शनास आल्यास तात्काळ नजीकचे पोलीस ठाणे अथवा वनविभागास संपर्क साधावा.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक **श्री. संजय दराडे सा्o** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. निलोत्पल सा्o** यांचे मार्गदर्शनाखाली **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सहा.पोलीस निरीक्षक **श्री.संदिप दुनगहू,** सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा सुहास छत्रे, वसंत महाले, राजु मोरे, सुनिल पानसरे, पोना राकेश उबाळे, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ यांचे पथकाने सदर कारवाई केली आहे.